## <u>निशाणी ५ खाली आदेश</u>

**०१.** प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी वा त्यांच्यातर्फे कुणीही वादमिळकत अ,ब, क हया दाव्याचा अंतिम लागेपर्यंत कोणत्याही प्रकारे हस्तांतरीत करु नये असा अंतरिम मनाई हुकुम मिळण्यासाठी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश क्रम ३९ नियम १ व २ अन्वये दाखल केला आहे.

**<u>वादीचे अर्जातील थोडक्यात कथन खालीलप्रमाणे आहे</u> –**

**०२.** मौजे वाकद, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद येथील गट नं. ३१ क्षेत्रफळ ५ हेक्टर ९ आर पैकी १ हे. ४९ आर की ज्याच्या चतुःसिमा पुढीलप्रमाणे आहेत – पुर्वेस – रमेश भागाजी व लिलाबाई रघुनाथचे शेत, पश्चिमेस – शोभाबाई सुरेश तेली यांचे शेत, उत्तरेस– नदी, दक्षिणेस–गोपाळ बाबुराव यांचे शेत आहे. तसेच गट नं. गट नं. ३१ क्षेत्रफळ ५ हेक्टर ९ आर पैकी १ हे.२० आर की ज्याच्या चतुःसिमा पुढीलप्रमाणे आहेत– पुर्वेस – रघुनाथ छगन यांचे शेत, पश्चिमेस – मगन परदेशी यांचे शेत, उत्तरेस– दावा कलम नं. १ अ, मधील प्रतिवादी क्र. १ चे नावावरील शेतजमीन, दक्षिणेस– गोपाल चोभे यांचे शेत आहे. तसेच गट नं. ३१ क्षेत्रफळ ५ हेक्टर ९ आर पैकी ० हे. ८० आर की ज्याच्या चतुःसिमा पुढीलप्रमाणे आहेत – पुर्वेस – रघुनाथ छगन यांचे शेत, पश्चिमेस – मगन रमेश यांचे शेत, उत्तरेस– दावा कलम नं. १ अ, मधील प्रतिवादी क्र. १ चे नावावरील शेतजमीन, दक्षिणेस–गोपाळ बाबुराव यांचे शेत आहे. (उपरोक्त मिळकतीस संक्षिप्ततेकरीता **'वादमिळकत अ, ब व क'** असे संबोधण्यात येईल.)

**०३.** वादीचे असे कथन आहे की, तो व प्रतिवादी क्र.१ हे सख्खे भाऊ असुन प्रतिवादी क्र. २ व ३ हया त्यांच्या बहिणी आहेत. सर्व वादमिळकती हया वादी व प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचे वडिल कै. नामदेव पाटील यांच्या होत्या. ते दि. ०२.०९.१९८८ रोजी मरण पावले. नामदेव यांचे निधन झाल्यानंतर वारस म्हणुन वादी व प्रतिवादी क्र. १ ते ३ तसेच वादी व प्रतिवादी क्र. १ ते ३ ची आई कौसल्याबाई यांचे

नांव फेरफार क्र. ७३ अन्वये दि. ०५.०४.१९८९ रोजी नोंदवण्यात आले. सदर नोंद दि. ०५.०६.१९८९ रोजी मंजुर झालेली आहे. पैकी कौसल्याबाईचे नंतर निधन झालेले आहे. सर्व वादमिळकती वादी व प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्या वडिलोपार्जित मिळकती आहेत. सर्व वादमिळकतींचे वादी व प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्यात अद्याप पावेतो वाटप झालेले नाही.

**०४.** सर्व वादमिळकतींना प्रतिवादी क्र. १ चे नांव एकत्र कुटुंबकर्ता म्हणुन त्याने स्वतःहुन नांव लावुन घेतले होते. त्याचा गैरफायदा घेवुन वैयक्तीक अडचणीसाठी प्रतिवादी क्र.१ ने वादमिळकत ब व्याजाने पैसे घेवुन त्यास धर म्हणुन दि. ०७.०५.२००३ रोजी रक्कम रु. ६०,०००/– खरेदी मुल्य दर्शवुन प्रतिवादी क्र. ४ च्या हक्कात खरेदीखत नोंदवुन दिले. केवळ विश्वासापोटी वादी व प्रतिवादी क्र. २, ३ व त्यांची आई यांनी त्याच्यावर विश्वास ठेवला. तदनंतर, प्रतिवादी क्र. ४ ने वादमिळकत ब ही दि. १४.०६.२००६ रोजी प्रतिवादी क्र.५ ला नोंदणीकृत खरेदीखतान्वये रक्कम रु. ७७,०००/– विक्री केली. सदर विक्री देखील सावकारी व्यवहारातील होती. प्रत्यक्षात कब्जा मात्र प्रतिवादी क्र. १ चाच होता. सदर खरेदीखत हे नाममात्र होते.

**०५.** वादमिळकत क यावर देखील एकत्र कुटुंबकर्ता म्हणुन प्रतिवादी क्र. १ चे नांव असल्याने त्याचा गैरफायदा घेवुन वैयक्तीक अडचणीसाठी प्रतिवादी क्र.१ ने वादमिळकत क व्याजाने पैसे घेवुन त्यास धर म्हणुन दि.२४.०८.२००१ रोजी रक्कम रु. ३३,५००/– खरेदी मुल्य दर्शवुन प्रतिवादी क्र. ६ च्या हक्कात खरेदीखत नोंदवुन दिले. प्रत्यक्षात वादमिळकत ब व क चा कायमस्वरुपी खरेदीविक्री व्यवहार झालेला नाही. सर्व वादमिळकती हया वडिलोपार्जित हिंदु कुटुंबातील अविभाज्य मिळकत आहेत. एकत्र कुटुंबाची कोणतीही गरज नसतांना सदर विक्री करण्यात आल्या आहेत. त्यामुळे ती खरेदीखते वादींच्या हिस्स्यांवर बंधनकारक नाही. प्रस्तुतचा दावा हा वाटपाचा दाखल केलेला आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादींनी पुन्हा विक्री केल्यास दाव्यात गुंतागुंत निर्माण होईल. सबब, प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

**<u>प्रतिवादी क्र. ४ ते ७ चा लेखी जबाब</u> –**

**०६.** सर्व प्रतिवादी क्र. ४ ते ७ यांनी दाव्यास व अर्जास **<u>नि.क्र.–१२</u>** अन्वये लेखी जबाब दाखल केला आहे. प्रतिवादींनी लेखी जबाबाद्वारे दि. ०७.०५.२००३,

२४.०८.२००१ ची खरेदीखते मान्य केली आहेत. मात्र, सदर खरेदीखते ही नाममात्र व सावकारी व्यवहारास धर म्हणुन केली आहे ही बाब अमान्य केली आहे. वादी व प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्यातील नातेसंबंधाबाबतची बाब देखील अमान्य केलेली नाही. अर्जातील उर्वरित मजकुर मात्र नाकारण्यात आला आहे. प्रतिवादींचे असे कथन आहे की, गट नं. ३१ हा प्रतिवादी क्र. १ याच्या मालकी व कब्जाचा होता. सन २००१ मध्ये त्यास एकत्र कुटुंबाच्या गरजेसाठी पैशांची निकड होती. सबब, त्याने गट नं. ३१ पैकी ८० आर जमीन प्रतिवादी क्र. ६ ला नोंदणीकृत खरेदीखतान्वये दि. २४.०८.२००१ रोजी विक्री केली आणि त्याच वेळेस कब्जाही हस्तांतरीत केला. या खरेदीखताला वादी व प्रतिवादी क्र. १ ते ३ यांची आई वादी तसेच प्रतिवादी क्र. २ व ३ यांनीही संमती दर्शवीली आहे. त्याप्रमाणेची बाब देखील खरेदीखतात नमुद आहे. खरेदीखताप्रमाणे प्रतिवादी क्र. ६ चे नांव वादमिळकत क चे महसुल अभिलेखाला नोंदवण्यात आले.

**०७.** त्यानंतर पुन्हा सन २००३ मध्ये प्रतिवादी क्र. १ ला पैशांची निकड होती. सबब, त्याने वादमिळकत अ ही प्रतिवादी क्र. ४ ला नोंदणीकृत खरेदीखतान्वये दि. ०७.०५.२००३ रोजी विक्री केली व कब्जाही हस्तांतरीत केला. या खरेदीखताला वादी व प्रतिवादी क्र. १ ते ३ यांची आई वादी तसेच प्रतिवादी क्र. २ व ३ यांनीही संमती दर्शवीली आहे. त्याप्रमाणेची बाब देखील खरेदीखतात नमुद आहे. खरेदीखताप्रमाणे प्रतिवादी क्र. ४ चे नांव वादमिळकत ब चे महसुल अभिलेखाला नोंदवण्यात आले. या खरेदीखतापासुन प्रतिवादी क्र. ४ ते ६ हे त्यांच्या खरेदी क्षेत्राच्या कब्जेवहीवाटीत आहेत. या खरेदीखताबाबत वादी, प्रतिवादी क्र. २ व ३ यांना पुर्णपणे माहिती आहे. प्रतिवादी क्र. ४ याने त्याला पैशांची गरज असल्याने सदर वादमिळकत ही दि. १४.०६.२००६ रोजी प्रतिवादी क्र. ५ ला नोंदणीकृत खरेदीखतान्वये विक्री करुन कब्जाही हस्तांतरीत केला. त्याप्रमाणे प्रतिवादी क्र. ५ चे नांव वादमिळकत ब चे महसुल अभिलेखाला नोंदवण्यात आले.

**०८.** प्रतिवादी क्र. ६ यांस देखील पैशांची गरज असल्याने त्यांनी वादमिळकत क ही नोंदणीकृत खरेदीखतान्वये दि. ०१.०६.२००९ रोजी विक्री करुन कब्जाही हस्तांतरीत केला. खरेदीखताप्रमाणे प्रतिवादी क्र. ७ चे नांव महसुल अभिलेखाला नोंदवण्यात आले आहे. या सर्व बाबी वादी यांना माहित असतांना देखील खोटा दावा व पर्यायाने प्रस्तुतचा खोटा अर्ज दाखल केला आहे. उपरोक्त कारणांवरुन अर्ज फेटाळण्याची विनंती

प्रतिवादींनी केली.

**०९.** खालील मुद्दे निर्णयासाठी उपस्थित होतात, त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे –

| **अ.क्र.** | **<u>मुद्दे</u>** | **<u>निष्कर्ष</u>** |
|---|---|---|
| **०१.** | वादीच्या बाजुने प्रथमदर्शनी केस आहे असे वादीने दाखविले आहे का? | **...<u>नकारार्थी</u>.** |
| **०२.** | वादीच्या बाजुने सोयीचा तोल आहे असे वादीने दाखविले आहे का? | **...<u>नकारार्थी</u>.** |
| **०३.** | वादीच्या बाजुने मनाई हुकुम न दिल्यास त्याचे कधीही न भरुन निघणारे नुकसान होईल असे वादीने दाखविले आहे का? | **...<u>नकारार्थी</u>.** |
| **०४.** | काय आदेश? | **...<u>अर्ज नामंजुर</u>.** |

## <u>कारणेमिमांसा</u>

**१०.** वादीतर्फे सन्माननीय विधीज्ञ श्री.पी.एम.चौधरी यांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी तर्फे सन्माननीय विधीज्ञ श्री.आर.ए.गिरी यांचा युक्तीवाद ऐकला. पटलावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

### <u>मुद्दे क्र.– १ ते ३ करीताः</u>–

**११.** उपरोक्त मुद्दयांचे निष्कर्ष एकमेकांशी निगडीत असल्याने त्यांची कारणमिमांसा एकत्रीत नोंदवली आहे. वादींच्या कथनाप्रमाणे सर्व वादमिळकती हया एकत्र हिंदु कुटुंबाच्या अविभाज्य मिळकती आहेत. अद्याप सर्व वादमिळकतींचे वादी व प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्यात वाटप झालेले नाही. केवळ प्रतिवादी क्र. १ चे नांव वादमिळकतीच्या महसुल अभिलेखाला एकत्र कुटुंब कर्ता असल्याचा गैरफायदा घेवुन त्याने वादमिळकत ब ची विक्री प्रतिवादी क्र. ४ ला, सावकारी व्यवहारातुन व्याजाने घेतलेल्या पैशात धर म्हणुन नाममात्र खरेदीखतान्वये विक्री केली आहे. प्रत्यक्ष कब्जा हस्तांतरीत केला नाही.

पुन्हा प्रतिवादी क्र. १ ने त्याचे एकत्र कुटुंबकर्ता या नोंदीचा गैरफायदा घेवुन वादमिळकत क ची विक्री प्रतिवादी क्र. ६ ला सावकारी व्यवहारातुन व्याजाने घेतलेल्या पैशात धर म्हणुन नाममात्र खरेदीखतान्वये विक्री केली आहे. प्रत्यक्ष कब्जा हस्तांतरीत केला नाही. प्रतिवादी क्र. ४ ने पुन्हा सदर मिळकत प्रतिवादी क्र. ५ ला तर प्रतिवादी क्र. ६ ने सदर खरेदी केलेली मिळकत प्रतिवादी क्र. ७ ला विक्री केली. प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे उपरोक्त सर्व खरेदीखत हे नाममात्र नसुन खरेदीविक्रीचा व्यवहार आहे. या खरेदीखताप्रमाणे महसुल अभिलेखाला नोंदीही नोंदवण्यात आलेल्या आहेत. खरेदीखतावेळी वादी, प्रतिवादी क्र. २ व ३ व त्यांची आई यांनी संमती दर्शवलेली असुन त्याप्रमाणे खरेदीखतात उल्लेख आहे.

**१२.** एकंदरीतच, वादींच्या कथनाप्रमाणे कुटुंबाची निकड नसतांना प्रतिवादी क्र. १ ने वडिलांची वादमिळकत ब व क सावकारी व्यवहारातुन घेतलेल्या पैशास धर म्हणुन विक्री केल्या. तर, प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे सदर विक्री हया नाममात्र नसुन खरोखरच खरेदीचा व्यवहार झालेला असुन कब्जाही हस्तांतरीत करण्यात आलेला आहे. प्रत्यक्षात वादी व प्रतिवादी यापैकी कुणीही खरेदीखते पटलावर दाखल केलेली नाहीत. त्यामुळे एकत्र कुटुंबाच्या गरजेतुन प्रतिवादी क्र. १ ने विक्री केली किंवा नाही हया बाबी पटलावर येत नाही. मात्र, पटलावर दाखल असलेल्या ७/१२ उता–याच्या प्रमाणीत प्रतीवरुन प्रतिवादी कथन करतात त्याप्रमाणे प्रतिवादी क्र. ५ व प्रतिवादी क्र. ७ चे नांव सध्या स्थीतीत कब्जेदार सदरी नोंदवल्याचे दिसुन येते. त्याचप्रमाणे, वादमिळकत ब चे खरेदीखत हे दि. ०७.०५.२००३ रोजीचे असुन वादमिळकत क चे खरेदीखत हे दि. २४.०८.२००१ रोजीचे आहे. याचाच अर्थ, खरेदीखत नोंदवल्यापासुन दावा दाखल करेपर्यंतचा कालावधी हा सुमारे २० ते २२ वर्षांचा आहे. या कालावधीत प्रतिवादींच्या नावाने महसुल अभिलेखाला नोंदवण्यात आलेल्या नोंदींना वादीने कुठेही आव्हानित केल्याचे पटलावर नाही. सबब, आज रोजी प्रतिवादी क्र. ५ व प्रतिवादी क्र. ७ हे अनुक्रमे वादमिळकत ब व क च्या कब्जेवहीवाटीत आहेत. वादमिळकतींची खरेदीखते पटलावर नसल्याने ते एकत्र कुटुंबाच्या गरजेतुन झाले किंवा कसे याचा उहापोह दाव्याच्या अंतिम सुनावणी वेळी करता येईल. तुर्तास तरी, प्रतिवादी क्र. ५ व ७ हे वादमिळकतीचे मालक व कब्जेदार असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. सबब, प्रथमदर्शनी केस, न्यायाचा समतोल वादीच्या बाजुने नाही अशा परिस्थितीत अंतरिम मनाई हुकुम मंजुर केल्यास प्रतिवादीचेच नुकसान होणार आहे. उपरोक्त कारणेमिमांसेवरुन मी मुद्दे क्र. १ ते ३ चे

निष्कर्ष मी नकारार्थी नोंदवितो.

**<u>मुद्दा क्र.– ४ करीताः</u>–**

**१३.** वरील दिलेल्या कारणमिमांसेवरुन वादी हा अंतरिम मनाई हुकम मिळण्यास पात्र नाही. त्यामुळे मी खालील आदेश पारीत करीत आहे –

**<u>आदेश</u>**

**०१.** वादीचा अर्ज निशाणी क्र. ५ हा नामंजुर करण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by ROHIT NANDKISHOR PATHAK
Date: 2024.03.19 17:53:16 +0530

[आर.एन.पाठक]

**<u>दिनांक</u> : १६.०३.२०२४.**

दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,
सोयगांव.

**CERTIFICATE**

"I affirm that the contents of this P.D.F. file Order are same word to word, as per original Order".

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | K. P. Dusane. |
| Court | :- | C.J.J.D. & J.M.F.C., Soygaon. |
| Date | :- | 16.03.2024. |
| Order signed by presiding Officer on | :- | 19.03.2024. |
| Order uploaded on | :- | 19.03.2024. |